# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10.dte@gmail.com Internet :http/www.dte.org.in


क्रमांक : १०/प्रवेश/२०१२/८२५

दिनांक : - 9 AUG 2012

प्रति,
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक,
अमरावती, औरंगाबाद.

विषय :- पदविका अभियांत्रिकी प्रवेश समउपदेशन फेरीबाबत.

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची तिसरी प्रवेश फेरी समउपदेशनाव्दारे दि.१७-८-२०१२ रोजी आयोजित केली आहे. याबाबतची अधिसूचना संकेतस्थळावर, तसेच वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर समउपदेशन फेरी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणाच्या शासकीय तंत्र निकेतनामध्ये आयोजित करण्यात आलेली आहे. प्रत्येक शासकीय तंत्र निकेतनामध्ये कोणत्या संस्थेचे प्रवेशा होणार आहेत, ही माहिती देखील अधिसूचनेव्दारे देण्यात आलेली आहे. ज्या संस्थांचे प्रवेश शासकीय तंत्र निकेतनांमध्ये होणार आहेत, अशा सर्व संस्थांनी आपले दोन प्रतिनिधी संबंधित शासकीय तंत्र निकेतनामध्ये प्रतिनियुक्त करण्याविषयी आपल्या स्तरावरुन सर्व संस्थांना आदेशित करण्यात यावे. सदर प्रतिनियुक्तीमध्ये एक कार्यालयीन कर्मचारी असणे आवश्यक आहे. समउपदेशन फेरीसाठी आवश्यक शुल्क प्रत्येक संस्थेने जमा करुन त्याची पावती विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे, तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत शासकीय तंत्र निकेतनातील प्राचार्यांना आवश्यक ती मदत करावी. सदरची समउपदेशन फेरी आपल्या मार्गदर्शनाखाली सर्व शासकीय संस्थांमध्ये घेण्यात यावी.

शिक्षण
सर्व संबंधीत
संस्थांना कळवावे.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण, म. रा., मुंबई.

---

महत्वाचे

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
क्र.विकाअ/शिक्षण/पदविका प्रवेश/२०१२/२९६५
दिनांक : - 10/08/2012

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित
पदविका अभियांत्रिकी संस्था.

उपरोक्त पत्रात दिलेल्या निर्देशाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

प्रत :- प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळी टाकण्याकरीता.